सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र.पोमसं/३६/र.वका.(८३००)शा.नि.-अधिसूचना/०७/२०२५, मुंबई, दि. ई.स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ:-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक-EComp.No.१३८७१७३/H.D. ४००१०/१०४/२०२५/SPECIAL१A, दि. १९/१२/२०२५

**विषय:-** विधानसभा निवडणूक—२०२४ बंदोबस्ताकरिता पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी भाडेतत्वावर घेण्यात आलेल्या ३०२ खाजगी वाहनांच्या रु.१,३८,१९,७२९/- च्या भाडे खर्चास कार्योत्तर मंजुरीबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक EComp.No.१३८७१७३/H.D ४००१०/१०४/२०२५/SPECIAL१A, दि.१९/१२/२०२५ ची महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५१२१९१५२८२२२१२९असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
CHANDRASHEKHAR GOVINDRAO SHINDE
Date: 23-12-2025 13:01:30

( चंद्रशेखर शिंदे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व.का) (अति.कार्यभार )
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,
कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक ३०

प्रत :-
अपर पोलीस महासंचालक, (प्रशासन) , महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, प्रशासन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस आयुक्त, पुणे शहर.
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक (लेखा).

प्रत,
पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय/परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**विधानसभा निवडणूक - २०२४ च्या बंदोबस्ताकरिता पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी भाडेतत्त्वावर घेण्यात आलेल्या ३०२ खाजगी वाहनांच्या रु. १,३८,१९,७२९/- च्या भाडे खर्चास कार्योत्तर मंजुरीबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्र. EComp. No.१३८७१७३/H.D.४००१०/१०४/२०२५/SPECIAL१A**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : १९ डिसेंबर, २०२५

**संदर्भ:-** विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन), पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय यांचे पत्र क्र.DGP- D३००२७/४०/२०२४-DESK३०, दिनांक २५/११/२०२५

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक- २०२४ च्या बंदोबस्ताकरिता पुणे शहर पोलिस आयुक्तालयामार्फत खाजगी वाहने भाडेतत्त्वावर घेण्यात आली होती. सदर वाहने कायदा व सुव्यवस्था राखणे, केंद्रीय सशस्त्र पोलीस दल (BSF/SSB/CRPF) यांच्या कंपन्यांच्या हालचाली, सेक्टर पेट्रोलिंग, होमगार्ड जवानांची वाहतुक आणि नवप्रविष्ट पोलीस कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षण केंद्र ते नियुक्ती स्थळ वाहतुकीसाठी वापरण्यात आली. प्रादेशिक परिवहन कार्यालय (RTO), पुणे यांनी निश्चित केलेल्या भाडेदरानुसार (५% जी.एस.टी. सहित) एकूण ३०२ वाहनांचा वापर करण्यात आला. सदर वाहनांच्या भाड्यापोटी एकूण रु. १,३८,१९,७२९/- (अक्षरी रुपये एक कोटी अडतीस लाख एकोणीस हजार सातशे एकोणतीस फक्त) खर्च झाला आहे. सदर रकमेच्या कार्योत्तर मंजूरीसाठी सादर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. याबाबत शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**<u>शासन निर्णय :-</u>**

वरील प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यात येत असून, महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक- २०२४ च्या बंदोबस्ताकरिता पुणे शहर पोलिस आयुक्तालयामार्फत भाडेतत्त्वावर घेण्यात आलेल्या खाजगी वाहनांच्या एकूण रुपये १,३८,१९,७२९/- इतकी देय रक्कम अदा करण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

सदर खर्च मागणी क्र.बी-१ लेखाशिर्ष-२०५५, पोलीस १०९ (००) (०१) जिल्हा पोलीस बल (२०५५०१६८) ५०-इतर खर्च" या लेखाशिर्षाखाली वित्तीय वर्ष २०२५-२६ च्या उपलब्ध अनुदानातून भागविण्यात यावा.

वाहन भाड्यापोटी प्राप्त होणाऱ्या सर्व देयकांची छाननी करुन ती योग्य असल्याची खातरजमा करण्यात आल्यानंतर सदर देयके अदा करावीत.

सदर खर्च हा भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार केल्याचे मानण्यात येईल. पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी सादर केलेली सर्व आवश्यक कागदपत्रे (उदा. वाहन पुरवठादारांचे प्रमाणित बिल, Format-C, भाडेदर पत्रक, प्रमाणपत्र इ.) तपासणी करून योग्य असल्याची खातरजमा करावी.

भविष्यात सदर प्रकारचा खर्च करण्यापूर्वी पूर्वमंजुरी घ्यावी.

हा शासन निर्णय वित्त विभाग शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३ /प्र.क्र.३०/२०१३ विनियम,भाग-२ दिनांक १७/०४/२०१५ अन्वये वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ मधील, भाग पहिला, उप विभाग-दोन मधील अनुक्रमांक-१३, नियम क्र. ६० व ६१ अन्वये प्रशासनिक विभागास असलेल्या पूर्ण अधिकारात निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०२५१२१९१५२८२२२१२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने

Digitally signed by ARVIND TULSHIRAM SHETE
Date: 2025.12.19 15:29:58 +05'30'

**(अरविंद शेटे)**
**उप सचिव,महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखा व परिक्षा, महाराष्ट्र-१, मुंबई)
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
पोलीस आयुक्त, पुणे शहर
निवडनस्ती (कार्यासन विशा-१अ)